बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

महिला व बाल विकास
WOMEN & CHILD DEVELOPMENT

# बाल हक्क संरक्षण आयोग महाराष्ट्र राज्य

## मुलांची काळजी घेताना बाल न्याय व्यवस्थेची भूमिका

- आरोग्य
- शिक्षण
- वाहतूक
- कुटुंब
- माध्यम
- बाल न्याय व्यवस्था
- शासकीय व्यवस्था
- स्वयंसेवी संस्था
- समाज
- पोलीस



Vidhayak Bharti
A Child Rights Advocacy Initiative

Scanned with CamScanner



**प्रिय महाराष्ट्रवासीयांनो,**

आपल्या सर्वांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई यांच्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा.

बालकांच्या हक्कांसंदर्भात भारताचे संविधान आणि संयुक्त राष्ट्र परिषदेने निहीत केलेल्या बालहक्कांशी; सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम आणि प्रशासकीय तांत्रिक बाबी या सुसंगत असाव्यात यासाठी बालहक्क आयोग हा कटीबद्ध आहे.

'स्वप्न बाल स्नेही महाराष्ट्राचे बाल मत्तांच्या सन्मानाचे' या विचाराने बालकांसाठी अनुकूल अशी यंत्रणा राज्यात आणि पोलीस प्रशासनाद्वारे स्थापन करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मित्रांनो, बालहक्क आयोगाद्वारे आपल्याला कोणताही कायदा आणि घटनात्मक तरतुदी तपासता याव्यात यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रात बाल हक्क उल्लंघनाची चौकशी व्हावी. यानंतर उल्लंघनाच्या प्रकरणी केवळ निर्देश जारी करून भागणार नाही तर त्यांची काटेकोर अंमलबजावणीही झाली पाहिजे.

बालकांबरोबर होत असलेली सामाजिक दुष्कृत्य, घरगुती हिंसाचार, तस्करी, गैरवर्तन, छळ आणि शोषण, सायबर-गुन्हे, आणि बाल - वेश्याव्यवसाय, बालविवाह यांच्यामुळे बालकांना असलेला धोका तपासणं गरजेचे आहे. असं घडत असल्यास पीडित बालकांना आधार वाटावा, त्यांची कोणीतरी काळजी घेणारे आहे अशा विश्वास निर्माण व्हावा यासाठी उपाययोजना सुचवल्या जाणं गरजेचं आहे.

अडचणीत सापडलेली, उपेक्षित आणि वंचित पार्श्वभूमी असलेल्या मुलांची विशेष काळजी घेऊन आणि त्यांना सुरक्षित करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील कसे करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करा.

भारतीय राज्यघटनेतील शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षण मिळणे हा बालकांचा मूलभूत अधिकार आहे. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. यामुळे सर्व मुलांना, विशेषत: समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी मिळेल.

बालकांच्या हक्कांचे उल्लंघन होत असल्यास किंवा बाल संरक्षण हक्क कायद्याचे पालन होत नसेल तर त्याची चौकशी करा.यासंदर्भातील घटनांची स्वत:हून ( 'स्युओ-मोटो') दखल घेऊन त्या प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे.

मित्रांनो,या आयोगाची अध्यक्ष या नात्याने, मला व्यक्तिशः समाजातील सर्व स्तरांना आमच्या या मोहीमेत सामील होण्याचं आवाहन करते आहे. "बाल-रक्षक" म्हणून चला आपण सर्वजण मिळून बालस्नेही महाराष्ट्राच्या दिशेने खांद्याला खांदा लावून पुढे नेऊया..

धन्यवाद,<br>
सुसीबेन शहा

Scanned with CamScanner


## पोलीस ठाण्यात 'बालस्नेही प्रक्रिया' अंमलात आणायची म्हणजे नेमकं काय करायचं... आणि कुणी करायचं... कुठे कुठे करायचं हे आपण समजून घेऊयात...

बालस्नेही प्रक्रियेची सुरुवात स्वत:पासून आपण करायला हवी. आपल्या सर्वांनी आपण व्यक्तिगत स्तरावर मुलांशी कसं वागतो, कसं बोलतो आणि मुलांकडून काय आणि कशा अपेक्षा ठेवतो याबाबत समजून घेणं फार आवश्यक आहे.

### आपलं पोलीस ठाणे 'बालस्नेही' आहे का?

हे समजून घेण्यासाठी या गोष्टी लक्षात असूद्यात. आपल्या पोलीस ठाण्यात **'बाल कल्याण पोलीस अधिकारी' (CWPO)** यांची नियुक्ती झालीय का किंवा या पदाची जबाबदारी कोणा एका अधिकाऱ्यावर निश्चित करण्यात आली आहे का? असल्यास त्या व्यक्तीची माहिती पोलीस ठाण्याच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे का ? बालस्नेही प्रक्रिया तयार करण्यात, समजून घेण्यात आणि रुजवण्यात आपला पुढाकार महत्वाचा...

आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध सामाजिक उपक्रम राबावणारी मंडळं, गणेशोत्सव मंडळं, आणि इतर सांस्कृतिक उपक्रम राबवणारी मंडळं आणि व्यक्ती यांच्या कार्यक्रमात आणि आयोजनात आपण मुलांच्या सहभागाविषयी आणि त्यांच्या सुरक्षिततेविषयी सातत्यानं मांडणी करायला हवी. स्थानिक मंडळांच्या पुढाकारानं मुलांसाठी संरक्षित वातावरण तयार करण्यास प्राधान्य हवं.




कोणत्याही उत्सव काळात आनंदाची पेरणी होत असतानाच मुलांसोबतच्या हिंसेचं प्रमाण ही वाढलेलं असतं. उत्सव काळात आपल्या कुटुंबातील, परिसरातील आणि पोलीस ठाण्यातील परिसरात संपर्कात येणाऱ्या मुलांची काळजी आपण घेतोय का? उत्सवकाळात अनेक प्रलोभनं दाखवली जातात आणि याला अनेक मुलं आणि मुली बळी पडतात... उत्सव काळात या सर्व गोष्टींवर आपण बारीक लक्ष ठेऊयात. आपल्या मुलांची सुरक्षितता जपुयात

कोणत्याही उत्सव काळात आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मंडळांच्या सहकार्यानं बाल संरक्षण' विषयक बैठक घेणं आवश्यक आहे. अशा बैठकांमध्ये महिला आणि मुलांचा सहभाग घेऊन त्यांच्या

Scanned with CamScanner

माध्यमातून मंडळांच्या हद्दीत कार्यक्रमांची आखणी करणं आणि परिसरात मुलांच्या सुरक्षिततेविषयी प्रदर्शन किंवा पोस्टर्स प्रदर्शित करणं शक्य आहे.

उत्सव काळात आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुलींसोबत छेड-छाडीच्या घटना होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना केल्या जातातच पण त्यात आपण एक गोष्ट लक्षात ठेऊयात की अशी घटना ज्या मुलांच्या बाबतीत घडेल त्या मुलांचा आत्मविश्वास डळमळणार नाही आणि त्यांना बाहेर पडण्याची कायमची भीती वाटणार नाही. **संरक्षित वातावरण तयार करणं ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी.**

उत्सव काळात मुलांकडून अनेक 'इंप्रेशन' मारण्याचे प्रकार केले जातात. मग ती बाईक सवारी असेल..., मित्रांच्या सोबतीनं एखाद्या मुलीला त्रास देणं असेल..., ऑनलाइन छळवणूक असेल... किंवा 'पैज' लावून एखाद्या मुलीस प्रपोज करणं असेल या सर्वांचा मुलींवर खूप परिणाम होत असतो. आपल्या हद्दीत या सर्व प्रकारांना आळा घालायला हवा. **यासाठी आपल्या सर्वांची भूमिका खूप महत्वाची...**

**आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उत्सव मंडळांना आपल्या या सूचना गेल्या आहेत का?**

- कोणत्याही परिस्थितीत मुलींची छेड छाड होणार नाही याची काळजी घ्यावी?
- उत्सव काळात कोणत्याही बालकाला कुणी त्रास देत असेल तर याबाबत मदत कक्ष किंवा संपर्क व्यक्ती आपण नेमला आहे का?
- आपल्या पोलीस ठाण्यातील 'बाल कल्याण पोलीस अधिकारी' यांचे संपर्क क्रमांक उत्सव मंडळांच्या आयोजकांकडे आहेत का?

**आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उत्सव मंडळांना आपण या गोष्टी करायला सुचवू शकता. '**

- बाल रक्षक' म्हणून कायम भूमिका निभावणं
- उत्सव काळात मुलांच्या सुरक्षिततेविषयी कार्यक्रम आखणं
- पालकांना मुलांच्या संदर्भातील कायद्यांविषयी जनजागृती करण्याचं नियोजन
- वस्तीपातळीवर मुलांसाठी 'बाल संसाधन केंद्र' उभारणं
- किशोरवयीन मुलांसोबत सतत संवाद कार्यक्रम

Scanned with CamScanner

## आपल्या पोलीस ठाण्यात 18 वर्षांच्या आतील बालक जर कुणा विरुद्ध कायदेशीर तक्रार असल्याचं सांगत असेल तर...

- अशा तक्रारीची आपण तात्काळ दखल घेणं आवश्यक
- तक्रार करणारी व्यक्ती कशा स्वरूपाची तक्रार दाखल करण्यास आली आहे यासाठी त्याला / तिला सर्वोतोपरि सहकार्य करणं आवश्यक.
- तक्रार जर कुटुंबियांच्या विरोधात असेल तर मात्र अधिक काळजी घेऊन त्याबाबत अधिक चौकसपणे माहिती घेऊन तक्रारदारास सहकार्य करण्याची भूमिका हवी.
- तक्रार देणाऱ्या व्यक्तीला समजून आणि उमजून घेऊन कायदेशीर कशी मदत उपलब्ध होऊ शकते याचं मार्गदर्न अवश्य करावं.
- बालकांना कायद्याची माहिती आणि समज नसते याबाबत त्यांना नीट माहिती देण्याचा प्रयत्न आपण करू शकतो.
- बाल न्याय व्यवस्था काय आणि कशा स्वरूपाची मदत करू शकतात याबाबत माहिती द्यायला हवी.
- तक्रार देणारं बालक कुणा विरोधात तक्रार देऊ इच्छित आहे हे लक्षात घेऊन त्याला / तिला सहकार्य करण्याची भूमिका असावी.
- बालकाचं म्हणणं काय आहे हे लक्षात घेऊन त्याला कशा स्वरूपात मदत करू शकतो याची नीट तयारी आपण करायला हवी.
- बालकाच्या तक्रारीत तथ्य आहे हे लक्षात घेऊनच आपण पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरू करायला हवी.
- बालकाला निर्भय आणि नि:संकोच वाटेल अशा वातावरणात बालकाची चौकशी करून बालकाकडून मिळालेली माहिती ही महत्वपूर्ण मानून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू करायला हवी.
- बालकाला कुणाचेही भय नसेल अशा वातावरणात पुढील काही दिवस ठेवता येऊ शकेल का याची खातरजमा करून तशी व्यवस्था करण्याची तयारी सुरू करायला हवी.



## आपल्या पोलीस ठाण्यात 18 वर्षांच्या आतील बालकाला 'काळजी आणि संरक्षणाची गरज असणारं बालक' म्हणून आणलं गेल्यास आपली भूमिका

- काळजी आणि संरक्षणाची गरज कोणत्या बालकांना आहे. बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, 2015 आणि सुधारित 2021 मधील तरतुदी नुसार **कलम 2 उपकलम 14 नुसार** काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी मुलं कोण याची माहिती देण्यात आली आहे.
- काळजी आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या बालकांना बाल कल्याण समिती समोर सादर करणं महत्वाचं आहे. बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, 2015 आणि सुधारित 2021 मधील तरतुदी नुसार **कलम 31 उपकलम 1 नुसार** या सर्व बालकांना पोलीस 24 तासांच्या आत बाल कल्याण समिती समोर सादर करून त्यांना बालगृहात दाखल करण्याचे आदेश घेऊ शकतात.
- काळजी आणि संरक्षणाची गरज असणारे बालक आपल्या पोलीस ठाण्यात आल्यावर त्या बालकांसोबत शक्यतो **'बाल कल्याण पोलीस अधिकारी'** आणि ज्या अधिकाऱ्यांचे बाल न्याय क्षेत्राबाबत प्रशिक्षण झाले आहे अशा अधिकाऱ्यांच्या कडूनच संवाद होणं आवश्यक आहे.
- बालकाशी संवाद साधताना **'बालस्नेही भूमिकेतून'** संवाद होईल याची काळजी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे संवाद प्रक्रिया सहज आणि सुलभ करण्यासाठी बालकांच्या मानसिकतेचा विचार करून कार्यवाही करण्याची भूमिका असायला हवी.



Scanned with CamScanner

## समजा एखादं बालक घर सोडून आलेलं असेल तर...

- घरातून निघून येण्यामागे काय कारण आहे... घरात कुणा व्यक्तीकडून काही छळ किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास दिला जात नाहीये... किंवा नेमकं असं काय कारण घडलं ज्यामुळे बालकाला घर सोडावं लागलं हे समजून घेणं आवश्यक आहे.
- त्याची माहिती घेतल्यानंतर आवश्यक भासल्यास बाल कल्याण समिती समोर सादर करून त्या बालकाला मर्यादित कालावधी साठी बालगृहात दाखल करून घेता येते पण... पालकांच्या ताब्यात पोलिसांना देण्याचे कोणतेही अधिकार नाहीत जर पालकांच्या ताब्यात द्यायचं असेल तर बाल कल्याण समितीचा आदेश आवश्यक असतो.
- कधी कधी आपण पालकाच्या भूमिकेत जाऊन त्या बालकाला समजावण्याचा किंवा थोडं रागावून समजावण्याचा प्रयत्न करतो... आपली भूमिका अशा वेळी कितीही चांगली असली तरीही... बालकाचं घर सोडण्याचं कारण लक्षात घेऊनच पुढील कार्यवाही काय करायची हे लक्षात असूद्यात मुलांचा कोणत्याही प्रकारचा छळ कुणाकडूनही कायद्याला मान्य नाही.
- बालकाला पालकांच्या ताब्यात बाल कल्याण समितीच्या आदेशांच देता येतं असा आदेश करण्यापूर्वी बाल कल्याण समिती त्या बालकाबाबत कौटुंबिक सामाजिक तपासणी अहवाल मागवते आणि त्यानंतरच परिस्थिती आणि बालकाचं मत लक्षात घेऊन योग्य तो निर्णय देत असते.
- बाल कल्याण समिती ला सहयोग करणं ही आपली भूमिका असायला हवी.

## आपल्या पोलीस ठाण्यात समजा एखाद्या बालकाचा भीक मागण्यासाठी वापर होत असेल आणि अशा बालकाला काळजी आणि संरक्षणाची गरज असणारं मूल म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतलं असेल तर...

- मागण्यासाठी बालकाचा कोण वापर करत आहे याचा शोध घेण्यात येवून अशा व्यक्ती किंवा संस्था यांच्या विरोधात पोलीस बाल न्याय अधिनियमाच्या कलम 76 अन्वये गुन्हा दाखल करू शकतात.
- एखाद्या बालकाचा भीक मागण्यासाठी वापर होत असल्याची तक्रार पोलीस ठाण्यात आली तर... तक्रार करणारी व्यक्ती त्या बालकाला मदत करू इच्छित आहे हे लक्षात घेऊन त्या बालकाला काय आणि कशा स्वरूपात मदत करता येईल याची काळजी घ्या. बालक एकटं भीक मागत आहे की कोणत्या टोळी सोबत भीक मागत आहे याची शहानिशा करूनच पुढील कार्यवाही करण्याची तयारी करावी.
- बालकाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत त्या ठिकाणाहून बालकाची सुटका करण्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. अशा वेळी आपण स्वयंसेवी संस्थाची मदत घेऊन पुढील कार्यवाही करणं अपेक्षित आहे. बालकाला सुरक्षित स्थानी हलवून मगच पुढील प्रक्रिया आणि कायदेशीर सोपस्कार पूर्ण होतील याची काळजी घ्यायला हवी.

Scanned with CamScanner

## भीक मागण्यासाठी वापर होत असलेल्या बालकाची सुटका केल्यानंतर...

- बालकाच्या सुरक्षिततेसाठी बालकाला बालगृहात बाल न्याय अधिनियमच्या कलम 31 (1) अन्वये दाखल करण्यासाठी अर्ज करता येतो.
- बालकाच्या पुढील पुनर्वसनासाठी किंवा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी बाल कल्याण समिती आदेश देते.
- बाल कल्याण समितीच्या आदेशिवाय बालकाला पालकांच्या ताब्यात देता येत नाही.
- बालकाचा वापर पालकांकडून किंवा भीक मागणाऱ्या टोळयांकडून होत असेल तर त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून बालकाला काळजी आणि संरक्षणाची गरज असल्यामुळे त्याचं योग्य असं पुनर्वसन करण्याची प्रक्रिया सुरू होते.
- बालकाचं सर्वोत्तम हित लक्षात घेऊन पोलीस, बाल कल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी आणि बालगृह व्यवस्थापन एकत्रित सामूहिक प्रयत्न करतील.



## बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियमातील कलम 2 उपकलम 14 मधील (1) नुसार बेघर मूल किंवा रस्त्यावरील मूल सापडले असेल तर...

- अशा बालकाला रस्त्यावर का राहावं लागलं याची माहिती घेऊन त्यानुसार योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणं अपेक्षित आहे. अशा बालकांसाठी काम करणाऱ्या संस्थांची मदत घेऊन त्या बालकाच्या पालकांचा शोध घेणं शक्य आहे का किंवा अशा बालकाची कोणत्याही पोलीस ठाण्यात 'हरवल्याची नोंद' घेण्यात आली आहे का याचा शोध घेण्यात यावा.

- अशा बालकासोबत रस्त्यावर राहाताना कोणत्याही प्रकारचा शारीरिक, आर्थिक आणि लैंगिक अत्याचार तर झाला नाहीये ना? याची खातरजमा करून घेऊनच पुढील प्रक्रिया करणं अपेक्षित आहे.

- सुरुवातीस बालकांचे खुलून बोलणे शक्य नसते. बालकाला सुरक्षित वातावरण आणि वेळ देणं आवश्यक आहे. न जाणो कदाचित महत्वाची माहिती समोर येईल.

- अशा बालकासोबत जर कोणतीही अत्याचाराची घटना घडली असेल तर त्याची स्वतंत्र माहिती घेऊन त्याबाबत बाल कल्याण समितीच्या मार्गदर्शनानुसार योग्य अशी कायदेशीर कार्यवाही होईल याची काळजी घ्यायला हवी.

- अशा बालकांना रस्त्यावरच राहण्याची सवय झालेली असते पण रस्त्यावर एकटं राहत असल्यास अत्याचाराची शक्यता अधिक असते हे लक्षात घेऊन अशा बालकांशी संवाद करून बाल कल्याण समितीसमोर सादर करून अशा बालकांना आवश्यतेनुसार किंवा पालकांचा शोध लागेपर्यंत बालगृहात दाखल करणं कधीही चांगलं. बालकांच्या सुरक्षिततेबाबत ही भूमिका पोलिसांनी घेणं आवश्यक आहे.

## बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियमाच्या कलम 2 अन्वये काळजी आणि संरक्षणाची गरज असणारे मूल म्हणून 'काम करणाऱ्या मुलांची' सुटका केल्यास त्याबाबत भूमिका घेताना करावयाची प्रक्रिया...

- काम करत असणाऱ्या मुलांबाबत कुणीही माहिती पोलीस ठाण्यास दिल्यास किंवा फोनद्वारे कळविल्यास किंवा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून माहिती मिळाल्यास त्या माहितीच्या आधारे त्वरित कार्यवाही करण्याच्या प्रक्रियेत भूमिका घेणे महत्वाचे आहे.

- काम करणाऱ्या मुलांसोबत मालकांकडून किंवा त्यांना कामासाठी राबविणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेकडून शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि लैंगिक छळवणूक होत असल्याची शक्यता लक्षात घेऊन त्याबाबत योग्य अशी चौकशी आणि कायदेशीर आधार घेऊन न्याय्य प्रक्रिया होतील याची काळजी घ्यायला हवी.

Scanned with CamScanner

- काम करणाऱ्या मुलांबाबत माहिती मिळाल्यावर या मुलांची सुटका करताना त्यांच्या कामाच्या ठिकाणाची नीट माहिती, मुलं किती तास काम करतात त्याची माहिती, कुणासाठी काम करतात, किती वेतन मिळते, कामाचा तपशील, सोबत कोण काम करतात, कामामुळे मुलांना काय धोका आहे याची सर्व प्राथमिक माहिती मिळवणं आवश्यक.
- काम करणाऱ्या मुलांबाबत माहिती मिळाल्यावर या मुलांची सुटका करताना त्या ठिकाणी मुलांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घेत सुटकेचा प्लान तयार करणं आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेत मुलांची सुरक्षितता सर्व प्रथम ही भूमिका सर्वात महत्वाची.



- काम करणाऱ्या मुलांची कामाच्या ठिकाणाहून सुटका केल्यानंतर या सर्व मुलांना काळजी आणि संरक्षणाची गरज आहे हे लक्षात घेऊन जिल्ह्यातील बाल कल्याण समिती समोर सादर करणं आवश्यक आहे. या मुलांना कोणत्याही परिस्थितीत कुणाच्याही दबावामुळे परस्पर कुणाच्याही ताब्यात देण्याचे अधिकार पोलिसांना आणि कुणालाही नाहीत.
- काम करणाऱ्या मुलांची कामाच्या ठिकाणाहून सुटका केल्यानंतर मुलं काम करत असणाऱ्या ठिकाणाची नीट चौकशी करून मुलं कुठून आणली होती?, मुलं किती तास आणि किती मोबदल्यात काम करत होती?, कामाच्या ठिकाणी त्यांच्यासाठी व्यवस्था काय होत्या?, कामाच्या ठिकाणी त्यांना कोणता त्रास होत होता? जे काम करत होते ते काम धोकादायक की अधोकादायक याची शहानिशा होणं आवश्यक.

## काम करणाऱ्या मुलांची कामाच्या ठिकाणाहून सुटका केल्यानंतर...

- काम करण्याच्या ठिकाणाहून मुलांच्या व्यक्तिगत वस्तु मुलांना घ्यायला सांगणे आणि त्यांना त्या मिळतील याची काळजी घेणे.
- मुलांच्या काम करत असलेल्या दिवसांचे वेतन त्यांना मिळेल याची काळजी घेणे.
- मुलांसोबत संवाद साधून काही राहून तर गेले नाहीये ना याची खातरजमा करणे.
- काम करण्याच्या ठिकाणाहून मुलांचे काम करण्याचे फोटो आणि कशा स्वरूपाचे काम करत होते याचे पुरावे गोळा करणे.
- मुलांच्या कामाच्या नोंदी असण्याच्या कागदपत्रांची छाननी आणि ते सर्व दस्तावेज ताब्यात घेणे.
- मुलांकडून काम करवून घेत असल्याची माहिती इतर प्रत्यक्ष साक्षीदारांच्या कडून घेणे.
- काम करण्याच्या ठिकाणाहून मुलांचे काम करण्याचे फोटो हे फक्त कायदेशीर कामाच्या प्रक्रियेतच वापरले जातील याची काळजी घेणे.

Scanned with CamScanner

- मुलांची माहिती किंवा त्यांची ओळख पटेल अशी कोणतीही माहिती माध्यमांच्या प्रतिनिधींपर्यंत पोहचणार नाही याची काळजी घेणे.
- काम करणारी मुलं हि काळजी आणि संरक्षणाची गरज असणारी मुलं आहेत हे लक्षात घेऊन त्यांचासोबत बाल न्याय्य प्रक्रियेत त्यांना सोबत करणे.
- काम करणाऱ्या मुलांना काळजी आणि संरक्षणाची गरज आहे हे लक्षात घेऊन त्यांना बाल कल्याण समितीसमोर सादर करणं.
- काम करणाऱ्या आस्थापना किंवा मालकाच्या विरोधात कायदेशीर तक्रार नोंदविणं.
- मालकाला न्यायालयात हजर करणं आणि पुढील कायदेशीर तपास पूर्ण करून अहवाल सादर करणं
- मालकाच्या विरोधात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करताना एक लक्षात असूद्यात कि बाल आणि किशोर कामगार अधिनियम यांच्यासोबत आय.पी.सी. आणि बाल न्याय अधिनियम 2015 मधील कलमं यांचा वापर पोलिसांनी करणं आवश्यक आहे.
- याच सोबत जर मुलांसोबत लैंगिक अत्याचार झाला असेल तर पॉक्सो कायद्यातील कलमं वापरणं इष्ट ठरणार आहे.
- जर मूल अनुसूचित जाती किंवा जमातीतील असेल तर त्या कायद्यातील कलमं नक्कीच लावावी लागतील.
- मालकाच्या विरोधात कुणीही तक्रार दाखल करू शकतो. कामगार विभाग प्रतिनिधी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी, कुणीही सामाजिक कार्यकर्ते किंवा पोलीस स्वत: फिर्याद दाखल करू शकतात.
- मालकांना कोर्टात सादर करणं बंधनकारक आहे.
- आपण मुलांची सोडवणूक करतो आणि मालकांवर किंवा त्यांच्या प्रतिनिधीवर कायदेशीर कार्यवाही करतो हे मुलांना समजून सांगायला हवं.
- मालकाच्या विरोधात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना जामीन मिळणार नाही याची काळजी घ्यायला हवी.
- कधी कधी मालक वर्ग किंवा त्यांचे प्रतिनिधी पालकच मुलांना काम करण्यासाठी पाठवत आहेत असा युक्तिवाद करतात. अशा वेळी जरी पालक पाठवत असतील तरी मुलांना कामास ठेवण्याचा गुन्हा मालक करत आहेत हे निक्षून सांगावयास हवं.
- पालकांनी मुलांना कामास ठेवण्यासाठी आगाऊ पैसे घेतले असतील तर त्याबाबत चौकशी करून पालकांच्या विरोधात देखील गुन्हा दाखल करता येतो.
- मालकाच्या विरोधातील केस ही जिल्हा न्यायालयात किंवा मेट्रोपोलिटिन मॅजिस्ट्रेट समोरील न्यायालयात सादर करणं अपेक्षित आहे.

Scanned with CamScanner

- यासाठी मालकाच्या विरोधात आवश्यक ते पुरावे गोळा करून मालकाकडून गुन्हा झाल्याचे सिद्ध करण्याचं आव्हान पोलिसांनी घेणं आवश्यक.
- मालकाला जामीन मिळून मालक पुरावे नष्ट करणार नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी पोलिसांचीच आहे.
- बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर केल्यावर बाल कल्याण समिती मुलांना त्वरित पालकांच्या किंवा मालकाच्या ताब्यात देणार नाही याबाबत काळजी घेणं आवश्यक.
- बाल कल्याण समिती 120 दिवस चौकशी करण्यासाठी बालकाला बालगृहात दाखल करून घेऊ शकते अशा वेळेस पालकांच्या ताब्यात देण्याचा आग्रह आपण धरता कामा नये.
- बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर केल्यावर बाल कल्याण समितीला सर्वकष अहवाल पोलिसांनी सादर करणं आवश्यक आहे.
- हा अहवाल सादर करताना त्यात मुलांची काम करण्याच्या ठिकाणची स्थिती आणि त्यांना मिळणारे वेतन, कामाचा कालावधी आणि मुलं कामाला ठेवण्याची प्रक्रिया याविषयी माहिती अहवालात असणं आवश्यक आहे. याची बाल कल्याण समितीला निर्णय घेताना मदत होईल.
- बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर केल्यावर बाल कल्याण समितीसमोर या मुलांच्या चौकशी दरम्यान काही आणखीन शोषणाचे मुद्दे समोर आल्यास बाल कल्याण समिती त्याबाबत आवश्यक कायदेशीर कलमं एफ.आय.आर. मध्ये नोंदविण्यास आदेशीत करू शकते.
- बाल कल्याण समितीच्या आदेशशिवाय या बालकांना कुणाच्या ताब्यात देण्यास पोलीस म्हणून आपला विरोध असायला हवा.
- बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर केल्यावर बाल कल्याण समिती विहित चौकशी दरम्यान पोलिसांकडे केस विषयी अधिक माहिती मागवु शकते.
- बाल कल्याण समितीच्या ताब्यात मूल असताना जर केससाठी आवश्यक अधिक माहिती बाल कल्याण समितीच्या लक्षात आली किंवा त्यांच्याकडे उपलब्ध झाली तर ती माहिती बाल कल्याण समिती पोलिसांना देऊ शकते.
- बालकांना बाल कल्याण समितीसमोर सादर केल्यानंतर बालकाला पालकांच्या ताब्यात कधी द्यायचे याचा अधिकार बाल कल्याण समितीला आहे.
- पालकांच्या ताब्यात न देता बालकाला संबंधित राज्यातील त्या जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीच्या ताब्यात देऊन पुढील कार्यवाही करण्याच्या बाबत ट्रान्सफर प्रक्रिया बाल कल्याण समिती करते.

Scanned with CamScanner

## बालकांना कामाच्या ठिकाणाहून सोडवून त्यांचे कौटुंबिक पुनर्वसन करण्यापर्यंतच्या प्रक्रियेत या सर्वांचीच बालस्नेही भूमिका महत्वाची ठरते.

१. पोलीस विभाग प्रतिनिधी

२. कामगार विभाग प्रतिनिधी

३. महिला आणि बाल विकास प्रतिनिधी

४. बाल कल्याण समिती

५. शिक्षण विभाग

६. बालगृह अधिक्षक आणि कर्मचारी

७. जिल्हाधिकारी कार्यालय

८. जिल्हा बाल संरक्षण कक्ष


९. सरकारी वकील आणि न्यायालयं



## पोलिसांना किंवा कुणालाही दुर्लक्षित अवस्थेत टाकून दिलेलं एखादं मूल सापडल्यास किंवा दिसल्यास अशा मुलांबाबतीत निर्णय घेताना हे लक्षात असूद्यात.

- याबाबतची माहिती पोलिसांना देणं आवश्यक आहे.
- पोलिसांच्या चौकशीत आपण पोलिसांना सहकार्य करणं अपेक्षित.
- पोलिसांकडून त्या बालकाला हॉस्पिटलमध्ये दाखल करणं आवश्यक.
- बेवारस स्थितीत बालक सापडून आल्याची वर्दी बाल कल्याण समितीला देणं आवश्यक.
- बाळाला दाखल करतानाच एखादं छान नाव देणं आवश्यक.
- या बालकाला परस्पर दत्तक कुणालाही देता येत नाही बऱ्याचदा अनेक जण पोलिसांकडे किंवा हॉस्पिटलमध्ये जाऊन तशी मागणी करतात. कायदेशीर प्रक्रियेतूनच बाळ दत्तक घेता येते ही भूमिका पोलिसांकडून सांगणं अपेक्षित आहे.

- या बालकाच्या आरोग्याच्या काळजीसह त्याच्या जैविक पालकांचा शोध घेताना खूप खबरदारी घेऊन चौकशी करणं आवश्यक आहे.
- कोणत्या सामाजिक दूषणांमुळे बालकाला सोडून देण्यात आलं होतं यावर पुढील कायदेशीर कार्यवाही अवलंबून असते.
- या बालकाच्या जैविक पालकांचा शोध घेण्याचं महत्वाचं काम पोलिसांना करावं लागतं.
- जर शोध घेऊनही पालकांचा शोध नाही लागला तर तसा अहवाल बाल कल्याण समिती समोर देणं बंधनकारक आहे.
- बाल कल्याण समिती पोलिसांकडून असा अहवाल आल्यानंतर बालकांची दत्तक देण्यासाठीची प्रक्रिया करायला सुरुवात करते.
- बाल कल्याण समितीच्या समन्वयानं पोलीस अशा बालकांच्या पुनर्वसन प्रक्रियेत अतिशय महत्वाची भूमिका निभावू शकतात.
- बालक दत्तक जाईपर्यंत पोलीस त्या बालकाची माहिती बाल कल्याण समिती कडून घेऊ शकतात.
- विशेष दत्तक संस्थेच्या माध्यमातून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच बालकाला दत्तक देण्याची कार्यवाही होते हे लक्षात असू द्या.
- बाल कल्याण समितीच्या आदेशानं बालक 'दत्तक देण्यासाठी कायदेशीर मुक्त' केलं जातं.
- त्यानंतर देखील जैविक पालक पोलिसांना आढळून आल्यास त्याबाबतची माहिती बाल कल्याण समितीस देणं आवश्यक आहे.
- बाल कल्याण समिती जैविक पालकांशी बोलून पुढील कायदेशीर कार्यवाही काय असेल याची प्रक्रिया राबवतील.



## कायदेशीर लग्नाच्या वया अगोदर (बालविवाह) मुलाचं किंवा मुलीचं लग्न होत असल्याची माहिती मिळाल्यावर बालस्नेही प्रक्रिया पार पाडणे ही आपली जबाबदारी.

- बालविवाह होत असल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांकडून येत असते अपवादात्मक स्थितीत माहितीत तफावत असते म्हणून बालविवाह होत असल्याची माहिती आपल्या पोलीस ठाण्यात, चाइल्ड लाईनला, बाल संरक्षण कक्षाकडे आल्यावर किंवा कोणत्याही संवेदनशील व्यक्तीने दिल्यावर त्या माहितीवर आवश्यकतेनुसार तात्काळ कार्यवाही करणं ही सर्वात महत्वाची जबाबदारी यंत्रणा म्हणून आपलीच असते.

- बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीस म्हणून आपली भूमिका तात्काळ कार्यवाही करण्याकडे असायला हवी. अशा केसेसमध्ये दखल देण्यासाठी वेळ कमी असतो. उपलब्ध वेळेत सर्व माहिती घेत प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन कार्यवाही होणं अपेक्षित आहे. त्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांची मदत पोलिसांना घेता येते.

- बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यावर मुलीचे वय कायदेशीर लग्नायोग्य आहे किंवा नाही याची खातरजमा करणं आवश्यक आहे. यासाठी मुलीची जन्म तारीख असणारी अधिकृत कागदपत्र पाहणं आणि तपासणं आवश्यक आहे. हा तपासाचा भाग असल्यामुळे लग्नाची प्रक्रिया थांबवणं आणि तपास करणं आवश्यक.

- विवाह होत असणाऱ्या मुलीचे वय 18 वर्षापेक्षा कमी असल्याचं पुरावे जर उपलब्ध नसतील तर शाळेतील नोंदी किंवा अंगणवाडी ताई कडील नोंदी पुरावा म्हणून वापरता येतात. त्या ही पुढे वय निश्चित करताना अडचणी आल्यास बाल कल्याण समितीच्या आदेशानं ऑसिफिकेशन टेस्ट करून वय निश्चित करता येते.

- कुटुंबीय, नातेवाईक तसंच ज्यांचा कुटुंबावर प्रभाव आहे अशा सर्व व्यक्तींची मदत घेऊन बालविवाह थांबविण्यासाठी पुढाकार घेता येतो. तसंच बालविवाह केल्यास काय कायदेशीर कार्यवाहीला तोंड द्यावं लागेल आणि कुणाकुणाला द्यावं लागेल ह्याची समज सर्वांच्या समक्ष देण्यात यावी जेणेकरून सर्वांचे सहकार्य मिळेल.

- बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या प्रतिनिधीच्या सहकार्यानं किंवा कोणत्याही स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्यानं कुटुंबीयांशी संवाद साधून लग्न होणार नाही याची विशेष काळजी घ्यायला हवी त्यातूनही कुटुंबीयांनी ऐकलं नाही तर त्या सर्वांना कायदेशीर कार्यवाही काय होईल याची समज द्यावी.

- बालविवाह होत असलेल्या ठिकाणी पालकांना समज देवूनही बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा वेळेस दोन्ही कुटुंबांकडून 'हमीपत्र' घेणं आवश्यक असतं आणि हे हमीपत्र बाल कल्याण समितीसमोर त्यांनी देणं आवश्यक असतं. कारण बाल न्याय व्यवस्थेत ही प्रक्रिया आल्यानं पाठपुरावा करणं शक्य असतं.

Scanned with CamScanner

- बालविवाह होत असणाऱ्या ठिकाणी पोलिसांवर सामाजिक आणि राजकीय दबाव येण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांकडून संबंधित कुटुंबावर प्रतिबंधात्मक कार्यवाही आणि कायदेशीर कार्यवाही करताना बालविवाह जरी सामाजिक मुद्दा असला तरीसुद्धा कायदेशीर तरतुदी बालविवाह चे समर्थन करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात आहेत हे ठणकावून सांगावं.
- बालविवाह होत असणाऱ्या ठिकाणी उपस्थित नातेवाईक, वाजंत्रीवाले, स्वयंपाकी, फोटोग्राफर, भटजी, धर्मगुरू, सभा मंडप वाले... आणि उपस्थित सर्व या सर्वांना जबाबदार धरत बालविवाह थांबविण्याची कार्यवाही करता येते आणि गरज पडल्यास या सर्वांच्या विरोधात बालविवाह होण्यात सहभागी म्हणून गुन्हा दाखल करता येतो.
- बालविवाह होत असणाऱ्या ठिकाणी बालविवाह झाल्यास संबंधित नातेवाईक आणि आई वडिलांवर किंवा पालकांवर गुन्हा दाखल करता येतो मात्र यावेळी मुलीवर कोणत्याही प्रकारे गुन्हा दाखल करता येत नाही मुलीला काळजी आणि संरक्षणाची गरज आहे हे लक्षात घेऊन तिला बाल कल्याण समितीसमोर सादर करणं आवश्यक आहे.

## लैंगिक दुर्वर्तनाच्या प्रभावित बालकांच्या केसेसमध्ये बालस्नेही प्रक्रिया पार पाडताना आपल्या सर्वांकडून ही बालस्नेही प्रक्रिया अपेक्षित...

- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची कुणाही बालकानं माहिती अथवा तक्रार दिल्यास त्या बालकाच्या म्हणण्यावर विश्वास ठेऊन आपण त्याबाबत अधिक माहिती जाणून घेताना कायदेशीर आवश्यक बाबींवर भर देऊन माहिती एकत्रित करण्यात यावी. प्रभावित बालकाला एकाच वेळी सर्व माहिती देणं शक्य नाहीये हे लक्षात घेऊन आपली कार्यवाही सुरू ठेवावी.
- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची माहिती देण्यासाठी बालक कोणत्याही व्यक्तीकडे व्यक्त होऊ शकतं अशा वेळी त्या व्यक्तीची जबाबदारी आहे की ती माहिती संबंधित पोलिसांना कळविणं. मात्र ही माहिती कधी आणि किती वेळात दिली पाहिजे असे संकेत नाहीत तेंव्हा मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून मुलांच्या आणि पालकांच्या सहकार्यानं हे निर्णय घेणं आवश्यक ठरतं.
- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची माहिती बालक कुणाला ना कुणाला देऊ इच्छित असतं त्याची दस्तक आपण ऐकत आहोत का? आपण त्यांच्या आपुलकीच्या माणसांच्या यादीत आहोत का? या यादीत आपण असायला आपलेच प्रयत्न खूप महत्वाचे आहेत... अशा अवस्थेत आपण मुलांच्या हिताचे निर्णयकर्ते आहोत हे आपण लक्षात ठेऊन मुलांना समजून घेऊयात.
- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची माहिती पोलिसांपर्यंत आल्यावर पोलिसांकडून प्रभावित मुलीला किंवा मुलाला त्वरित मदत मिळण्याची कार्यवाही सुरू व्हायला हवी. जबाबदार अधिकाऱ्याकडून पुढील सर्व केसचे व्यवस्थापन होईल अशी भूमिका घेऊन पोलीस ठाण्यातील सर्व अधिकाऱ्यांचे नेटवर्क सक्रिय होणं अपेक्षित आहे.

Scanned with CamScanner

- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची घटना दोन अल्पवयीन बालकांमध्ये घडली असेल तर त्यापैकी प्रभावित बालकाला काळजी आणि संरक्षणाची गरज आहे तर दुसऱ्या बालकाला विधिसंघर्षग्रस्त बालक म्हणून मदतीची गरज आहे हे लक्षात घेऊन पुढील कार्यवाही होणं अपेक्षित आहे. यासाठी आपल्या जिल्ह्यातील बाल न्याय व्यवस्था माहित करून घेणं आवश्यक.
- लैंगिक दुर्वर्तन होत असल्याची घटना दोन अल्पवयीन बालकांमध्ये घडली असल्यास यापैकी जी व्यक्ती वयानं मोठी आहे त्या बालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करता येतो. मात्र त्याच वेळेस अशा बालकाला विधिसंघर्षग्रस्त बालक म्हणून बाल न्याय मंडळासमोर केस सादर करणं आवश्यक यासाठी सामाजिक पार्श्वभूमी अहवाल (SBR) सादर करणं आवश्यक आहे.
- लैंगिक दुर्वर्तन झाल्याबाबत तक्रार करण्यासाठी कुणीही 18 वर्षांखालील बालक पोलीस ठाण्यात आल्यावर त्या बालकासोबत करण्यात येणारा संवाद हा त्या बालकाला समजेल आणि उमजेल या प्रक्रियेत असावा. प्रश्न विचारताना बालकाला समजेल अशा स्वरूपाचे प्रश्न असावेत आणि उत्तरं देताना नीट देता येतील एवढे स्वयंस्पष्ट असावेत.
- प्रभावित बालकासोबत संवाद साधताना जर भाषेची किंवा संवादाची अडचण येत असेल तर 'सपोर्ट पर्सन' च्या सहकार्यानं दुभाषी किंवा मूल बोलत नसल्यास सांकेतिक भाषा जाणणाऱ्या तज्ज्ञांची मदत घेऊन बालकाचा जबाब घेण्यास भूमिका असावी... या प्रक्रियेत प्रभावित बालकाला त्रास होईल अशी आपली वागणूक होणार नाही.
- प्रभावित बालकासोबत संवाद साधल्यावर केस दाखल करण्याची प्रक्रिया जलद होईल याची काळजी घ्यायला हवी. जलद याचा अर्थ ज... ल... द... ह्या प्रक्रियेत मुलांशी संवाद, कायदेशीर प्रक्रिया, वैद्यकीय मदत प्रक्रिया, समुपदेशन आणि बाल न्याय व्यवस्थेसोबत संवाद आणि कार्यवाही या सर्व प्रक्रियेसाठी प्रतिसाद वेळ कमीत कमी राहील याची काळजी घ्यायला हवी.
- प्रभावित बालकासोबतचा झालेला संवाद आणि घटनेतील कृती लक्षात घेऊन वैद्यकीय तपासणी करण्याची भूमिका घेतली जाणे इष्ट ठरेल. वैद्यकीय तपासणीसाठी प्रभावित बालकासोबत जाणारी व्यक्ती आणि पोलीस कर्मचारी यांना घटनेची व्यापकता सांगून वैद्यकीय प्रक्रिया ही पुरावा म्हणून करायची आहे की प्रभावित बालकाला वैद्यकीय गरज म्हणून त्याप्रमाणे ठरवायला हवी.
- प्रभावित बालकांच्या बाबतची माहिती विहित नमुन्यात 'मनोधैर्य योजनेचा' लाभ मिळवून देण्यासाठी 'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण' यांच्या पर्यंत देणं पोलिसांना बंधनकारक आहे. माहिती जेवढ्या लवकर आपण प्राधिकरणाला देऊ तेवढ्या लवकर प्रभावित बालकाला आघातामधून बाहेर पडण्यास मदत होईल.
- प्रभावित बालकांबाबतची माहिती जिल्ह्यातील बाल कल्याण समितीस देणं बंधनकारक आहे. पोलिसांच्याकडून हि माहिती देणं अपेक्षित आहे. प्रभावित बालकाला बाल कल्याण समिती समोर सादर करणं हे प्रत्येक केस मधील व्यापकता आणि प्रभावित बालकाची सुरक्षितता लक्षात घेऊन होणं कायद्याला अपेक्षित आहे.

Scanned with CamScanner

- प्रभावित बालकांच्या 164 च्या बयानच्या वेळेस बालकाची मानसिक स्थिती आणि बालकाची तयारी किती आहे याचा अंदाज घेत आणि सर्वात महत्वाचं म्हणजे प्रभावित बालकाला कुठे घेऊन जाणार आहोत, कशासाठी नेत आहोत, तिथं कोण असणार आहे, त्यांच्याशी का बोलायचं आहे हे सर्व प्रभावित बालकाला समजावून सांगणं महत्वाचं कि तुझी माहिती किती महत्वाची असणार आहे.

- 164 बयान घेण्याच्या वेळी प्रभावित बालकांसोबत 'सपोर्ट पर्सन' किंवा जवळचं कुणी व्यक्ती असेल याची खातरजमा पोलिसांनी करणं आवश्यक आहे. त्यामुळे प्रभावित बालकाला बयान देताना भीती वाटत नाही आणि मोकळेपणानं माहिती मा. न्यायाधीश यांच्याशी बोलताना सोप्पं जातं. भीतीचं वातावरण नसेल याची काळजी घ्यायला हवी.

- प्रभावित बालकाला न्याय म्हणजे केवळ गुन्ह्याची कृती करणाऱ्या व्यक्तीला दंडीत करणं किंवा शिक्षा करणं इथेच पूर्णविराम मिळतो... पण... प्रभावित बालकाच्या जीवनावर त्याचा दिर्घ परिणाम काय होतोय, एकूणच त्या कुटुंबाला कोणत्या कोणत्या अडचणीनं ग्रासलं आहे, कोणत्या अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागत आहे आणि सर्वात महत्वाचं म्हणजे प्रभावित बालकाला न्यायाची प्रक्रिया आपण समजून सांगत आहोत का? हा मुद्दा आपण सर्वांनी लक्षात घ्यायला हवा.



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

स्वप्न बालस्नेही महाराष्ट्राचे बालमतांच्या सन्मानाचे

बाल हक्क संरक्षण आयोग

महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner